International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# ब्रिटिशकालीन शिक्षण व्यवस्था

**प्रा . गायकवाड बाळू भिमराव**
*इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त )*
*Corresponding Author – प्रा . गायकवाड बाळू भिमराव*
**DOI - 10.5281/zenodo.18709690**

**प्रस्तावना:**

ब्रिटिश सरकारने भारतात प्रथमपासून शिक्षण प्रसाराच्या कार्याला चालना देण्याचा प्रयत्न केला होता. पण शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषा असावी की देशी भाषा असावे तसेच पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण घ्यावे की भारतीय पद्धती चे घ्यावी याविषयी मतभिन्नता होती. भारतीयांना भारतीय भाषेतून तर इंग्रजांना इंग्रजी भाषेतून शिक्षण द्यावे असे वाटत होते. इंग्रजी माध्यमाचा पुरस्कार केला लॉर्ड मेकेलो हा इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार होता. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून प्राधान्य दिले गेले यापुढे इंग्रजी शिक्षणाच्या प्रचारासाठी सरकारचा पैसा खर्च करण्यात येईल इंग्रजी शिक्षणाचा प्रसार वाढू लागला व इंग्रजी शिक्षणला महत्व मिळाले.

**बोर्ड ऑफ एज्युकेशन:**

महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रसारात सुसूत्रता आणण्यासाठी १८४० मई ब्रिटिश शासनाने मुंबई येथे "बोर्ड ऑफ एज्यूकेशन" ची स्थापना केली. त मंडळामध्ये सरकार नियुक्त तीन व बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे तीन प्रतिनिधीचा समावेश होता. शिक्षणाची पध्दतशीर व्यवस्था करण्याचा पहित प्रयत्न या संस्थेने मुंबईमध्ये केला. इ.स.१८४४ पर्यंत बरीच चर्चा होऊन शिक्षणासाठी इंग्रजी माध्यम निश्चित करण्यात आले. अनेक इंग्रजी व मराठी शाळा सुरु झाल्या.

**चार्लस वुडचा खलिता :**

भारताच्या शैक्षणिक विकासातील महत्वाचा टप्पा म्हणजे सर चार्लर म्हण्जे वुडचा १८५४ चा शैक्षणिक खलिता होय. भारतीय शिक्षण पध्दतीला सुव्यवस्थीर तत्वे पाया प्राप्त करून देण्याचे कार्य चार्लस वुडच्या खलित्याने केले आहे. या खलित्याला "भारतीय शिक्षणाचा मॅग्नाचार्टा" असे म्हणतात. या खलित्यामध्ये १०० परिच्छेद असून भारतीय शिक्षण पध्दतीच्या महत्वाच्या प्रश्नांचा उहापोह केलाआहे. या खलित्यातील प्रमुख
तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

१. शासनाने आपल्या कर्तव्यात शिक्षणाला अग्रस्थान द्यावे.
२. भारतातील शिक्षण हे धर्मातीत / निधर्मी असावे.
३. शिक्षणाचे माध्यम म्हणून देशी भाषांना प्रोत्साहन देण्यात यावे.
४. शिक्षण पध्दतीत कनिष्ठ पातळीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सुसंवादनिर्माण करण्यात यावा.
५. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये यासारख्या शैक्षशिक आली
६. शिक्षणामध्ये खाजगी संस्थांना शाळा काढण्यास व चालविण्यात
७. पदवीपर्यंतचे शिक्षण महाविद्यालयातून देण्यात यावे. ही महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असावीत.

८. उच्च शिक्षणावर नियंत्रण ठेवण्यासाठी लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर भारतात विद्यापीठांची स्थापना करावी. त्यांच्याकडे परीक्षा घेणे पदवी देणे, परीक्षावर नियंत्रण राखणे, प्राध्यापकांची नियुक्ती करणे ही कामे असावीत.

९. मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी.

१०. शिक्षण सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात[१]

**वुडच्या खलित्याची अंमलबजावणी:**

सर चार्लस् वुडनी शिक्षणक्षेत्राविषयी केलेल्या शिफारशी किंवा सूचना म्हणजे भारतातील भावी काळातील शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने मांडलेली मार्गदर्शक न्थीत तत्वेच होती. लॉर्ड डलहौसीने हा वूडचा खलिता लगेचच स्विकारला.[२]

**हंटर आयोग :**

ब्रिटिश सरकारने सर चार्लस वूड यांनी केलेल्या शिफारशी स्वीकार त्याची अंमलबजावणी केली त्यानंतर शैक्षणिक प्रगतीची पाहणी करून त आवश्यक त्या सुधारणा सूचविण्यासाठी लॉर्ड रिपन याने १८८२ मध्ये विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला त्यास 'हंटर आयोग। म्हणतात या आयोगाचे २२ सदस्य होते. या आयोगास असे निर्देश देण्यात होते की, आयोगाने प्राथमिक स्थरावरील सर्व भारतातील शिक्षणाच्या सा पध्दतीचे निरीक्षण करून त्या सुधारणा व विस्ताराची योजना सुचवावी . कार्यक्षेत्र प्राथमिक व माध्यमिक शिक्षण होते.

आयोगाने इ.स.१८८२ ते १८८३ या काळात संपूर्ण देशाचा दौरा के विविध प्रांतातील शिक्षण संस्थाना भेटी दिल्या. शिक्षण तज्ज्ञाच्या भेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. विविध शिक्षण संस्थाच्या कार्याची पाहणी केली. या आयोगाने शैक्षणिक प्रगतीची समीक्षा केली आणि त्यानंतर मार्च १८८३० आपल्या शिफारशी शासनाला सादर केल्या. शासनाने या आयोगाच्या काही सूचना स्वीकारल्या तर काही सूचना फेटाळल्या, आयोगाच्या शिफारशीप्रमाणे प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात आले. खाजगी शिक्षण संस्थांना आर्थिक अनुदानाची पध्दत निश्चित वाल्याने शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी खाजगी शिक्षण संस्थांना प्रोत्साहन मिळाले.[३]

**भारतीय विद्यापीठ कायदा १९०४ :**

लॉर्ड कर्झनने १९०१ मध्ये सिमला येथे भारतीय शिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी व त्यावर विचारविनिमय करण्यासाठी एक शिक्षण परिषद बोलाविली होती. या परिषदेमध्ये १५० ठराव मंजूर करण्यात आले होते. विद्यापीठाची स्थिती सुधारणे, शैक्षणिक दर्जा उंचावणे अध्ययन व परीक्षा पध्दतीत सुधारणा करणे. यासाठी १९०२ मध्ये थॉमस रॅलेच्या नेतृत्वाखाली एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या अहवालाच्या आधारे लॉर्ड कर्झनने १९०४ मध्ये भारतीय विद्यापीठ कायदा पास केला त्यातील शिफारशी –

१. विद्यापीठांनी अध्ययन कार्यासाठी व संशोधनासाठी प्राध्यापकांच्या व त्यांच्या नियुक्तीची व्यवस्था करावी.

२. विद्यापीठ सदस्याची संख्या ५० पेक्षा कमी आणि १०० पेक्षा जास्त असू

३. हे सदस्य प्रामुख्याने सरकारव्दारा नामनियुक्त असावेत.

४. विद्यापीठावरील सरकारी नियंत्रण वाढविण्यात यावे.

५. खाजगी महाविद्यालयावरील सरकारी नियंत्रण अधिकच कडक करण्यात यावे.[४]

**सॅडलर कमिशन (१९१७ - १९२९) :**

कलकत्ता विद्यापीठाच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर अहवाल घेण्यास ग.ज.लॉर्ड चेम्सफर्ड याने एक कमिशन नेमले होते. या कमिशनचे अध्यक्ष कुलगुरू एम.इ. सॅडलर होते. त्यांनी विशाल दृष्टिकोन स्विकारून कलकत्ता विद्यापीठ व इतर विद्यापीठाच्या कामकाचाही अभ्यास केला या कमीशनाही १९१९ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला त्यातील प्रमुख शिफावर्धा पुढीलप्रमाणे आहेत

१. इंटरमिजिएटचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडावेत ती पराभूत जीवन झाल्यावर विद्यापीठात प्रवेश घ्यावा.
२. पदवी परीक्षा अभ्यासक्रम तीन वर्षाचा असावा.
३. मुलाच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी एखादे मंडळ स्थापावे.
४. व्यावसायिक धंदा शिक्षण यातील उणिवा विद्यापीठाने सोडवाव्यात.
५. हायस्कूलपर्यंत सर्व विषयाचे माध्यम देशी भाषा असावे त्यापुढी शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे.
६. अध्यापकाना प्रशिक्षण देण्यासाठी खूप सवलती दिल्या जाव्यात
७. परीक्षा पध्दतीत मुळापासून दुरूस्त्या करण्यात याव्यात.
८. शिक्षण क्षेत्रातील हस्तक्षेप कमी असावे.[५]

**हार्टीग समिती - १९२९:**

१९२९ मध्ये फिलीप हार्टीग यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती स्थापन केली.

यातील प्रमुख तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्राथमिक शिक्षणाला राष्ट्रीय महत्व द्यावे. त्याचे संघटन करावे.
२. शिक्षकाचा दर्जा राखण्यात सांगितला.
३. माध्यमिक शिक्षणात मॅटिकला महत्व होते कारण विद्यापीठ शिक्षणापत्यक्षता एक मार्ग होता.
४. अकार्यक्षम शाळाना वगळावे आणि कार्यक्षम असणाऱ्या शाळांना बळकटी असावी.
५. विद्यार्थ्यांना व्यावसायिक व औद्योगिक शिक्षणाकडे वळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे

या समितीने शिफारशी केल्या परंतु त्याची अमलबजावणी होवू शकली नाही.

**वर्धा योजना १९३७ :**

म. गांधी यांनी देशाच्या चळवळीमध्ये बहुजनीकरणाच्या आणि जीवनाभिमुखतेचा अभिनव उपक्रम मांडला होता. यातूनच १९३७ मध्ये 'वर्धा योजना' उदयास आली. देशाची प्रगती व स्वातंत्र्योत्तर नव समाजनिर्मिती साधावयाची असेल तर शिक्षणव्यवस्थेत आमुलाग्र बदल झाला पाहिजे यासाठी त्यांनी स्वातंत्र्याबरोबर शिक्षण परिवर्तनावर भर दिला. वर्धा येथे १९३७ मधील संमेलनात शिक्षणाबद्दल सांगोपाग चर्चा होऊन एक शिक्षण विषयक योजना तयार करण्यात आली ती योजना म्हणजे वर्धा योजना होय.

१. शिक्षण मातृभाषेतून द्यावे.
२. जे शिकवायाचे असेल त्याचा शारीरिक श्रमाशी व हस्तकलेशी संबंधजोडून शिकवावे.
३. हस्तव्यवसायची निवड मुलांच्या आवडीवर असावी.
४. हे सात वर्षाचे शिक्षण इतके स्वावलंबी व्हावे की, उत्पादीत हस्तकौशल्यातून शिक्षकाचा पगार भागावा अशी ही योजना होती.

परंतु ही योजना अमलात येण्याच्या दरम्यान दुसरे महायुध्द सुरु झाल्याने ही योजना मागे पडली.[६]

**सार्जंट अहवाल - १९४४ :**

सर जॉन सार्जंट यांनी १९४४ मध्ये शिक्षणविषयक एक योजना तयार केली. प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय, तांत्रीक व शारीरिक शिक्षण या सर्वांशी संबंधित ही योजना होती. वर्धा शिक्षण योजनेतील अनेक तत्वाचा स्वीकार करण्यात अला. प्राथमिक व माध्यमिक विद्यालये स्थापन करणे अकरा ते सतरा वर्षाच्या मुलासाठी सहा वर्षाची शिक्षण पध्दती तयार करणे ही योजना प्रत्यक्षात अमलात आणली नाही.

**राधाकृष्णन आयोग :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने भारतीय शिक्षणाची पुर्नस करण्यासाठी १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आद स्थापन करण्यात आला. १९४९ मध्ये सरकारला आपला अहवाल सादर केला.

१. विद्यापीठ स्तराआधी १२ वर्षाचा अध्ययन काळ असावा.
२. विद्यापीठात परीक्षाचे दिवस सोडून कमीत कमी १८० दिवस शिकवन काम असावे.
३. प्रशासकीय नोकरीसाठी विद्यापीठाच्या पदवीची आवश्यकता [७]

**शिक्षणाचे समाज जीवनावरील परिणाम :**

१. कंपनी सरकारने लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकाली होती. त्यामुळे महाराष्ट्रात शिक्षण प्रसार झाला.
२. भारतीय लोकांना भौतिक ज्ञान व पाश्चिमात्य शिक्षण देण्याची मिळाली.
३. शिक्षणातील उच्च वर्णियांची मक्तेदारी नष्ट करण्यात आली
४. समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना समानतेने शिक्षण घेण्यास संधी उपलब्ध झाली.
५. पाश्चिमात्य शिक्षणामुळे आधुनिक विचार समाजात रूजू लागते
६. सुशिक्षीतांना समाजातील अंधश्रध्दा, अनिष्ट चालीरीती जाती यांच्यातील फोलपणा दिसला.
७. खिश्चन मिशनऱ्यानी पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीसाठी फार मोठे पारिश्रम केला.
८. खिश्चन मिशनऱ्यानी दुर्बल घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला
१. सरकारचा दृष्टीकोन या शिक्षणामुळे सफल झाला.
९. राज्यकारभारासाठी आवश्यक असा कारकून वर्ग निर्माण करण्य
१०. इंग्रजी शिक्षणामुळे देशाच्या विविध भागातील लोकाशी संपर्क
११. भारतातील राष्ट्रवादाच्या चालनेस इंग्रजी भाषा व पाश्चात्य ! यांचा मोठा हातभार लागला.[८]

**संदर्भ ग्रंथ:**


१) प्रा. डॉ. विकास कदम , प्रा. डॉ. सुखदेव शिंदे,प्रा. रविराज कांबळे ,महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास , अरुणा प्रकाशन पान नं-४५
२) प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हणे , प्रा. डॉ. सुखदेव शिंदे ,भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास एज्यूकेशन पब्लिकेशन पान नं-१५२
३) पारसनीस न. रा. स्वातंत्र्योतर भारतीय शिक्षण ,नूतन प्रकाशन पुणे पान नं-१४७
४) उपरोक्त , प्रा. डॉ. विकास कदम , प्रा. डॉ. सुखदेव शिंदे,प्रा. रविराज कांबळे पान नं-१५२
५) उपरोक्त , प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हणे , प्रा. डॉ. सुखदेव शिंदे पान नं-१५५
६) उपरोक्त , पारसनीस न. रा. पान नं-१४९
७) कित्ता, पान नं-१५४
८) कित्ता , पान नं-४६